# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०४ एप्रिल, २०१६ / चैत्र १५, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) आदिवासी विकास मंत्री<br>(३) उद्योग मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

**लातूर जिल्ह्यातील उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याबाबत**

**(१) * ५२०५६ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील दुष्काळाची दाहकता वाढत असून लातूर एमआयडीसी तील सुमारे ६०० तर इतर तालुक्यातील सुमारे ६०० असे एकूण १२०० उद्योग असून त्यापैकी सुमारे ५० टक्के उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील या उद्योगांमध्ये सुमारे २० हजार कामगार कार्यरत असून यातील निम्मे उद्योग बंद केल्यामुळे दहा हजार मजुरांवर बेकारीची वेळ आली असून सदर प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे लातूर, अतिरिक्त लातूर व औसा औद्यो�गिक क्षेत्राला पाणीपुरवठा करण्या‍ात येत होता. तथापि मांजरा धरणातील पाणीसाठा संपला असल्यामुळे सदर औद्योगिक क्षेत्राचा पाणीपुरवठा बंद झालेला आहे. तथापि , महामंडळाने सदर औद्योगिक क्षेत्रात पाणी उपलब्धा करुन देण्याठसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्याद आहेत.

१) पाणी टंचाईच्यार काळात किमान पिण्याि‍साठी पाणी उपलब्ध होणेसाठी महामंडळातर्फे औद्योगिक क्षेत्रात विविध ठिकाणी विंधन विहिरी घेण्याणत येत आहेत.

२) लातूर जिल्हया‍ेतील औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना त्यांतचे मागणीप्रमाणे व भूजल सर्वेक्षण विभागाच्याऔ शिफारशीनुसार विंधन विहिरी खोदण्या ची परवानगी देण्या‍ात येते.

३) महामंडळाने लातूर महानगरपालिका व जिल्हात प्रशासन, लातूर यांना इतर स्त्रोळतातून पिण्या‍ासाठी पाणी पुरवठा करण्या ची मागणी केली आहे.

४) महामंडळाने वरिष्ठा भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लातूर यांनी सुचविलेल्याव ठिकाणी विंधन विहिरी खोदण्या‍ीची परवानगी दिलेली आहे.

(३) प्रश्ना उद्भ‍ानवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील दापोली वाकवली खेड भरणे रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(२) * ५२२८० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील दापोली वाकवली खेड भरणे रस्ता राज्य महामार्ग क्र. १६२ वर किमी १८ /०० ते २२ /०० या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वारंवार अपघात होत असून या मार्गावर रहदारी करणे अवघड झाले आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण विनाविलंब करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मागणीबाबत शासन विचार करणार आहे काय , या रस्त्याची सुधारणा व रुंदीकरण तातडीने करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

(४) कि.मी. २८/०० ते २९ /०२० मध्यो रुंदीकरणासाठी रु. २०० लक्ष व कि.मी. २४/०० ते कि.मी. २६/००, कि.मी. २६/६०० ते २६/७३०, कि.मी. २६/७८८ ते २६/९९० कि.मी. २७/५६५ ते २७ /९१५ मध्ये सुधारणा व डांबरीकरण करण्यारसाठी सुमारे रु. ३४० लक्ष रक्कीमेची आवश्यककता आहे. सदर कामे निधी , निकष व प्राथम्य.क्रमानुसार हाती घेऊन पूर्ण करण्याआचे नियोजन आहे.

-----------------

**रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या राईस मिलच्या मालकांनी सेस बुडविल्याबाबत**

**(३) * ४१७८८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या राईस मिलच्या मालकांनी सन २०१३ -१४ या आर्थिक वर्षात १० लाख रुपयांचा सेस बुडविल्याची बाब माहे डिसेंबर , २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समिती कडून अद्याप सेस वसुलीबाबत कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाब १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बुडालेला सेस वसुल करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. सन २०१३-१४ मध्ये बाजार समितीने रु.३९,३०,९८१/- इतका सेस वसूल केलेला आहे. तथापि , रु.१० लाख इतका सेस बुडविल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) ते (५) प्रश्न उद्भ्ाकवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील दौंड व शिरूर या दोन तालुक्यांमधील भीमा नदीवरील पूलाच्या बांधकामाबाबत**

**(४) * ५२२७६ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील दौंड व शिरूर या दोन तालुक्यांमधील भीमा नदीवर मोठा पूल नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने टाकळी ते टाकळी भीमा रस्त्यावर भीमा नदीवर मोठा पूल बांधणेबाबतचे निवेदन मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना माहे जानेवारी , २०१६ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास , टाकळी ते टाकळी भीमा रस्त्यावर भीमा नदीवर मोठा पूल बांधणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) प्रश्नांकित पूलाचे काम निकष , मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## सावंतवाडी तालुक्यातील माणगाव खोऱ्यातील निळेली-शिवापूर या रस्त्याची झालेली दुरावस्था

**(५) * ४३५६५ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी तालुक्यातील माणगाव खोऱ्यातील निळेली, दुकानवाड, शिवापूर या भागातून जाणाऱ्या निळेली-शिवापूर या सुमारे १४ किमी अंतराच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली असून वाहनधारकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे सदरहू रस्त्यांचे मजबूतीकरण , खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे म्हणून तेथील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ , रत्नागिरी, मा. पालकमंत्री , सिंधुदुर्ग जिल्हा , मा. सार्वजनिक बांधकाममंत्री , जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने दि नांक ६ जानेवारी, २०१६ रोजी शिवापूर पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कार्यालयावर भव्य मोर्चा काढून एक निवेदन पुन्हा सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निळेली ते शिवापूर या सुमारे १४ किमी अंतराच्या रस्त्याचे विनाविलंब मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
तथापि, या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले नाही.

प्रश्नांकीत रस्त्याची लांबी ही कनेडी-कुपवडे-नारुर-वाडोस-शिवापूर-कलबिस्त-वेरले-सांगेली-धवडकी-दाणोली-विलवडे-बांदा रा.मा. क्र. १९० चा भाग आहे. निळेली (कि.मी. ५० /५००) ते शिवापूर (कि.मी.६८ /०१०) या दरम्यान १७ .६० कि.मी. लांबीचा रस्ता आहे. या भागातील रस्त्यावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. कि.मी. ५७ /५०० ते कि.मी. ६०/५०० मध्ये सुधारणा व डांबरीकरण करण्याचे रु. १०० लक्ष रक्कमेचे काम अर्थसंकल्पात व कि.मी. ६० /५०० ते कि.मी. ६४ /५०० या लांबीतील डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याचे काम योजनेतर कार्यक्रमात रु. १२० .३० लक्ष इतक्या रक्कमेस मंजूर असून दोन्ही कामे निविदा स्तरावर आहेत. दोन्ही कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(६) * ५३१८८ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) , श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये सद्यस्थितीत सुमारे ५००० शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या रिक्त पदांवर सुमारे ३२०० शिक्षक रोजंदारी व तासिका तत्वावर काम करत असून त्यांनी शासन सेवेत कायम करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील रोजंदारी व तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना शासन सेवेत कायम करण्याबाबत शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णुस सवरा** (१) हे खरे नाही.

शासकिय आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांची २०३५ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर १२८९ कर्मचारी कार्यरत असुन त्यांनी कायम करण्याची मागणी केलेली आहे.
(३) व (४) विविध विभागांमध्ये अशा प्रकार च्या नियुक्त्या करण्यात आल्याने असे किती कर्मचारी कार्यरत आहेत त्यांचा एकत्रित तपशिल घेवून सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नांदेड येथील विष्णूनगर आणि वजिराबाद या आदिवासी वसतीगृहांतील असुविधांबाबत

**(७) * ४०३९६ श्री.राधाकृष्णर विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथे विष्णूनगर आणि वजिराबाद येथे १०० विद्यार्थी क्षमता असलेली दोन वसतीगृहे तर आनंदनगर भागातील १०० विद्यार्थी क्षमता असलेले एक मुलींचे वसतीगृह सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पुरविल्या जाणाऱ्या सोयी सुविधांकडे शासनाने केलेले दुर्लक्ष , त्यामुळे अनेक महिन्यापासून येथील वसतीगृहातील बेडींग साहित्य, गादी, वॉटर फिल्टर, स्पर्धा परिक्षा वर्ग, टंकलेखन, डीटीपी आदि सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे जानेवारी , २०१६ च्या मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी वसतीगृहातील सुरक्षा रक्षक , सफाई कामगार या शासकीय कर्मचाऱ्यांना काढून टाकून त्यांच्या जागी क्रिस्टल या खाजगी कंपनीकडून सुरक्षा रक्षक व सफाई कामगारांची दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खाजगी कर्मचाऱ्यांमुळे सुरक्षेचा प्रश्न कठीण झाला असून , स्वच्छतेकडेही दुर्लक्ष होत असून विद्यार्थी संख्या लक्षात घेता वसतीगृहांची क्षमता वाढविण्याबाबत तसेच इतर मागण्यांसाठी किनवट येथील प्रकल्प कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णुस सवरा :** ( १) नांदेड येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह , विष्णूनगर क्र.१ (मंजूर क्षमता ७५ ), आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह , वजिराबाद क्र.२ (मंजूर क्षमता ७५ ) व आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह , नांदेड (मंजूर क्षमता ७५) अशी एकूण तीन वसतीगृहे कार्यरत आहेत.

(२) सदर वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, गणवेश भत्ता, सहलीचे पैसे इत्यादी रकमांचे वाटप करण्यात आलेले आहे. बेडींग साहित्य , गादी इत्यादी पुरविण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे. वॉटर फिल्टर पुरविण्यासाठी अपर आयुक्त , अमरावती यांच्याकडे कार्यवाही सूरू आहे. स्पर्धा परिक्षा वर्ग , टंकलेखन, डीटीपी यांच्या प्रशिक्षणाकरिता पात्र संस्थांची प्रकल्प कार्यालयामार्फत निवड करण्यात आली असून प्रशिक्षण वर्ग मार्च अखेर पर्यंत सुरू होतील.

(३) व (४) वसतिगृह स्वच्छता ठेवण्यासाठी माहे डिसेंबर , २०१५ पासून नांदेड येथील प्रत्येक वसतीगृहावर एक सफाईगार व तीन पहारेकरी कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले असून नांदेड येथील कर्मचाऱ्यांचे किनवट प्रकल्पातील तालुका व ग्रामीण स्तरावरील शाळा व वसतीगृहांवरील रिक्त पदांवर समायोजन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सुरक्षा व्यवस्था व सफाईचे काम सुरळीत सुरू आहे.

वसतीगृह क्षमतेची वाढ करण्याची विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेऊन त्यानुषंगाने नागपूर विभागात रिक्त असलेल्या मुलांच्या १५० जागा व मुलींच्या ४५ जागा अशा एकूण १९५ जागा नांदेड येथील मुला-मुलींच्या वसतीगृहाकरिता वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सुमारे १४७ आश्रमशाळांना मंत्रीमंडळाच्या संमतीशिवाय प्रशासनाने मंजूरी दिल्याने त्यांचे अनुदान रोखण्यात आल्याबाबत**

**(८) * ४८७२३ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्या८य मंत्री**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १४७ आश्रमशाळांना मंत्रीमंडळाच्या संमतीशिवाय प्रशासनाने मंजूरी दिल्याने त्यांचे अनुदान रोखण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रीमंडळाच्या संमतीशिवाय हे प्रस्ताव मंजूर कशाप्रकारे करण्यात आले,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय , त्यात काय आढळून आले,

(४) तसेच या शाळांचे प्रस्ताव तातडीने मंजूर करुन अनुदान देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३ ) १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या पदांना उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता नसताना व त्यासाठी कोणतीही वित्तीय तरतूद केलेली नसताना क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी २५ ते ७५ % अनुदान वाटप केल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(४) व (५) उच्चाधिकार समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या माहितीसह व मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर फेर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**समाजकल्याण विभाग, गोंदिया (जि.गोंदिया) अंतर्गत ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**

**(९) * ५२४७० श्री.राजेश काशीवार (साकोली) , श्री.चरण वाघमारे (तुमसर) , श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सामाजिक न्या)य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभाग , गोंदिया (जि.गोंदिया) अंतर्गत सन २०११-१२ , २०१२-१३ व २०१३-१४ या शैक्षणिक वर्षातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची

शिष्यवृत्ती प्रलंबित असून याचा फटका जिल्हयातील ९ हजार विद्यार्थ्यांना बसला असल्याचे दिनांक २५ फेब्रुवारी , २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करण्याची मुभा असून ओबीसी करीता ऑनलाईनची सक्ती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्तीच्या भरवशावर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य लक्षात घेता शासन गोंदिया जिल्हयातील ३ वर्षापासून प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम समाजकल्याण विभागाकडे वर्ग करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नाही.

(३) सन २०१५-१६ साठी मंजूर तरतूदी वितरीत करण्यात आलेल्याे असून मागील प्रलंबित अर्ज प्राथम्यारने निकाली काढण्यारच्या सूचना सर्व जिल्हाय स्तवरावरील कार्यालयाना संचालक , विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय , पुणे यांचे स्त्रावरुन देण्या१त आलेल्याण आहेत.

(४) प्रश्नण उद्भ्ाावत नाही.

-----------------

## मलकापूर (जि. बुलढाणा) येथील रामा. २७७ वरील सुमारे १६ किमी लांबीचा रस्ता नादुरुस्त असल्याबाबत

**(१०) * ४८५११ श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि. बुलढाणा) येथील रामा.२७७ वरील जिगाव-चांदूर बिस्वा-निंबोळा देवी-टाकरखेड कि.मी. २७/०० ते ३३/०० (निंबोळा देवी ते मेंढळी फाटा) हा एकूण ६ कि.मी. लांबीचा रस्ता , नांदुरा - मोताळा हा कि.मी. ३३/०० ते ३८/०० (तरवाडी फाटा ते शेंबा) एकूण ५ कि.मी. लांबीचा रस्ता , नांदुरा-मोताळा हा कि.मी. ११/०० ते १४/०० (येरळी ते निमगाव फाटा) हा एकूण ३ कि.मी.

लांबीचा रस्ता व नांदुरा - मोताळा हा कि.मी. २२/०० ते २४/०० (माळेगाव फाटा ते लोणवडी) हा एकूण २ कि.मी. लांबीचा रस्ता हे रस्ते जागोजागी नादुरुस्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांवरून दुचाकी , चारचाकी वाहन धारकांना तसेच सर्वसामान्य शेतकरी व ग्रामस्थांना रहदारी करणे अत्यंत गैरसोईचे झाले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्यांचे विनाविलंब डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे असून सुमारे ६.८० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग , खामगाव यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे , नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीत डांबराने खड्डे भरण्याची कार्यवाही करण्यात आली असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

तथापि, सदर लांबीमधील रस्ता क्षतीग्रस्त असल्याने मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे.

(३) होय.

(४) प्रश्नांकित

१) कि.मी.३३/०० ते ३८/०० (५ किमी) व किमी ११/०० ते १४/०० (३ किमी) अशी एकूण ८ किमी लांबी - मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे.

२) किमी. २२/०० ते २४/०० (२ किमी) मधील लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

३) उर्वरित लांबीतील रस्ता सुधारण्याचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील सोडोली-मालेवाडी दरम्यानचा कानसा नदीवरील पूल धोकादायक बनला असल्याबाबत

**(११) * ४६९२८ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील उत्तर भागासाठी वरदान ठरलेल्या सोडोली-मालेवाडी दरम्यानचा कानसा नदीवरील पूलाच्या बांधकामास २० ते २५ वर्षे पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या पुलावरून उस वाहतूक व अवजड वाहने ये-जा करीत असून परिसर डोंगराळ असल्याने पावसाळ्यात पाण्याचा प्रवाहही मोठा असतो , हे खरे आहे काय,

(३) असल्यास , या पुलाचा एक खांब तुटल्याने पुलावरील वाहतूक धोक्याची बनली असून पूल ढासळल्यास जीवित हानी व वित्त हानी होण्याचा संभव आहे , हे खरे आहे काय,

(४) असल्यास , जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी पुलाचे नुतनीकरण करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

सदर पूल १० मीटरचे २ गाळ्यांचा असून या पूलाचा पिलर दगडी बांधकामात असून पायाजवळील भागातील दगडी चीरे निखळले होते.

(४) सदर पूलाच्या चीरे निघालेल्या ठिकाणी तात्काळ दुरुस्ती आवश्यक असलेल्या भागाचे आर.सी.सी. जॅकेटींग करुन दुरुस्ती व मजबुतीकरण करण्यात आले असून पूल सुस्थितीत व संरक्षित केलेला आहे.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील वडूज येथील येरळा नदीवर असणाऱ्या पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(१२) * ५२०७७ श्री.जयकुमार गोरे (माण) , श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील वडूज येथील येरळा नदीवर असणाऱ्या पुलाच्या स्लॅबच्या खालील बाजूचे व बाजूच्या कठड्यांचे कॉक्रिट उघडे पडले असून या पुलाचे संरक्षक पाईपही कमकुवत होऊ लागले असून या पुलाच्या दुरावस्थेमुळे येथील वाहतुकीस धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी , २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर पुलाच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकित पूलाच्याे कराड बाजूकडील पिलर नंबर, १२ व ३ च्यार स्लॅलबखालील कॉक्रिट उघडे पडले असून पुलावरील कठडे काही प्रमाणात क्षतिग्रस्तय झाले आहेत.

(२) सदर पुलाचे क्षतिग्रस्त स्लॅखबसंरक्षक कठडे व पाईप रेलिंग दुरुस्तीत करण्यालचे काम निविदा स्त रावर असून एप्रिल २०१६ अखेर पूर्ण करण्याईचे नियोजन आहे.

(३) प्रश्ना उद्भ्ावत नाही.

-----------------

## राज्यभरातील मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याबाबत

**(१३) * ५०४४७ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सामाजिक न्या य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन शिष्यवृत्तीमधील त्रुटीमुळे राज्यभरातील मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या १४ लाख १० हजार ३५७ विद्यार्थ्यांपैकी दिनांक १० फेब्रुवारी , २०१६ पर्यंत फक्त ३ लाख १५ हजार विद्यार्थ्यांचेच अर्ज

स्वीकृत झाल्यामुळे अकरा लाख महाविद्यालयीन विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) प्रश्ना उद्भ्ाचवत नाही.

(३) प्रश्ना उद्भ्ाचवत नाही.

(४) प्रश्नन उद्भ्ातवत नाही.

-----------------

## सांगली येथील वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१४) * ४७६८२ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेचे माजी अवसायक महेश कदम यांनी सन २०१०-११ या काळात केलेल्या व्यवहारांची चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक आणि विद्यमान अवसायक प्रकाश आष्टेकर आणि जिल्हा विशेष लेखापरिक्षक श्रीधर कोल्हापूरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१ ) होय.

सदर प्रकरणाची चौकशी श्री.श्रीधर कोल्हा पूरे जिल्हाच विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्थार सांगली हे करीत आहेत. श्री.प्रकाश आष्टेहकर हे चौकशी अधिकारी नसून वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेच्याथ अवसायक मंडळाचे अध्य क्ष आहेत.

(२) व (३) चौकशीचे काम सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्नी उद्‌्‌ामवत नाही.

-----------------

**कल्याण-मुरबाड (राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२) या महामार्गाचे चौपदरीकरण करणेबाबत**

**(१५) * ५०१६८ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-मुरबाड (राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ ) अरुंद असल्यामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने वाहतूक कोंडी होऊन अपघातांची संख्या वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सदर महामार्गाचे चौपदरीकरण करणेबाबत शासनाचा निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम करणेसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राष्ट्री�य महामार्ग क्र. २२२ कल्या‍ाण (शहाड) ते मुरबाड कि.मी. ९/८०० ते ३७/०० हा २७.२० कि.मी. महामार्ग दुपदरी डांबरी पृष्ठडभागाचा असून व्य.स्त. वेळी कांबा गावापर्यंतच्याह सुमारे ४.०० कि.मी. महामार्गावर वाहतूक कोंडी होते ही वस्तुतस्थिती आहे तथापि आतापर्यंत झालेले अपघात हे प्रामुख्याहने वाहनचालकांनी मोटर वाहन नियमांकडे केलेल्याप दुर्लक्षामुळे झाले असल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यायलय) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) मुंबई यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

केंद्रशासनाच्या् रस्तेलवाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत कल्यासण (शहाड) ते मुरबाड ह्या २८ कि.मी. लांबीमध्येम महामार्गाचे चौपदरीकरण करण्या चा निर्णय घेण्याबत आला आहे.

(३) सदरील चौपदरीकरणासाठी आवश्यलक असलेल्या भुसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्नच उद्भ्‍ालवत नाही.

-----------------

**चंद्रपूर शहरातील वरोरा नाका येथील उड्डाणपुलाच्या बांधकामाबाबत**

**(१६) * ४६४३३ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील वरोरा नाका येथील उड्डाणपुलांचे बांधकाम संथगतीने सुरु असल्यामुळे नागरिकांना गत चार वर्षांपासून वाहतुकीची समस्या निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , सदर उड्डाणपुलाचे बांधकाम संथगतीने सुरु असल्यामुळे कंत्राटदारांकडुन नुकसान भरपाई आकारण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास , चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने सदर उड्डाणपुलाचे बांधकाम कधी पर्यंत पुर्ण होणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

वाहतुक पोलीसाच्या सहाय्याने वहातुकीवर योग्य नियत्रंण ठेवून वहातूक सुरळीतपणे सुरु आहे.

(२) होय.

(३) व (४) उड्डाण पूलाच्या ठिकाणी असलेल्या जास्त वाहतुक वर्दळीमुळे व सेवा वाहिन्या स्थलातंरीत करण्यासाठी लागलेल्या कालावधीमुळे काम करण्यास विलंब झाला आहे. उड्डाण पूलाच्या बांधकामापैकी मूल रोड ते नागपूर रोड पर्यंतच्या

उड्डाणपूलाच्या भागाचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे. हे काम माहे एप्रिल २०१६ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत आहे. वरोरा नाका चौक ते डॉ. आंबेडकर कॉलेज चंद्रपुरकडे जाणाऱ्या उड्डाण पूलाच्या भागाचे काम प्रगतीत असून ते माहे जून २०१६ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

-----------------

**मौजे सरावली (ता.डहाणू, जि.पालघर) येथे आदिवासी विकास संकुल उभारण्यातबाबत**

**(१७) * ५३०१२ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सरावली (ता.डहाणू , जि.पालघर) येथे ८ एकर जमिनीवर आदिवासी विकास संकुल उभारण्या चा प्रस्ता व शासनाच्याा विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यारस सदर जागेमध्येच आदिवासींच्यान उद्धाराकरीता आदिवासी मुला-मुलींकरीता इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा , मुला-मुलींकरता शासकीय वसतिगृहे, आदिवासी जनतेकरीता सांस्कृेतिक भवन व आदिवासी प्रकल्पा कार्यालय उभारण्याीचे प्रस्ताावित ,आहेखरे आहे काय,

(३) असल्याससया प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यासविलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णुि सवरा** (१) व (२) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या नावे, मौजे लोणीपाडा, ता.डहाणू, जि.पालघर येथे असलेल्या जमिनीपैकी आठ एकर जमीन आदिवासी मुला-मुलींच्या ३ शासकीय वसतीगृह इमारतींचे बांधकाम व प्रकल्प कार्यालय, डहाणू या इमारतीच्या बांधकामाकरिता प्राप्त झाल्याची बाब खरी आहे.

(३) सदर जमिनीची मोजणी करण्याकरिता तहसिलदार, डहाणू यांनी संमती दिली असून जागा मोजणीसाठी भूमीअभिलेख कार्यालयात रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

-----------------

**डॉ.वसंतदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ या संस्थीने शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., कोकळे (सोनी) (जि.सांगली) या साखर कारखान्याात अवैधपणे केलेली गुंतवणूक**

**(१८) * ५३०१९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) , श्री.जितेंद्र आव्हा ड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.वसंतदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ , सांगली (पुर्वीचे शेतकरी मंडळ , बुधगाव) या संस्थेसने सुमारे २ कोटी ६२ लक्ष रुपये सन १९९४ पासून शेतकरी सहकारी साखर कारखाना , लि.कोकळे (सोनी) (जि.सांगली) या साखर कारखान्याखत अवैधपणे गुंतवणूक केली आहेहे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.वसंतदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळाने मौजे बावधन ता.मुळशी, जि.पुणे येथे सन २००१ मध्ये् खरेदी केलेली जमीन व त्यामवरील मालमत्ता. सदर संस्थेिच्या तत्कालेीन अध्यकक्षांनी त्यांदच्यान काही साथिदारांच्यास मदतीने स्वरतःच्यास खाजगी ट्रस्टत असलेल्याअ यूथ इंडिया यांचे नाव बदलून शेतकरी शिक्षण मंडळ, सांगली यांचे नावे करुन गैरव्यलवहार केल़ाहे ही खरे आहे काय,
(३) असल्याा़स यासंदर्भात चौकशी करण्याात आली आहे काय , त्यायत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यालत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. कलम ८३ च्या चौकशी अहवालानुसार डॉ. वसंतदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ या संस्थेकडून वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. कोकळे (सोनी) (जि.सांगली) या कारखान्याने दि. ४.९.१९९५ अखेर रु.२३६ लाख इतकी रक्कम घेतली होती. त्यापैकी दि. ३१.३.२०१५ अखेर रक्कम रु. ७९.७५ लाख इतकी रक्कम देणे आहे. तथापि, सदर ठेवी स्विकारताना कारखान्याने नोंदणी अधिकारी अथवा साखर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था , महाराष्ट्र राज्य , पुणे या कार्यालयाची मान्यता घेतलेली नाही.
(२) व (३) डॉ. वसंतदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ ही संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट या कायद्यांतर्गत नोंदणीकृत आहे. सदर संस्थेचा नोंदणी क्र.ई-५६४ , दि. १४.८.१९९४ असा आहे. सदर संस्थेच्या नावे स्थावर मिळकत दर्शविलेली

नाही. दि. शेतकरी शिक्षण मंडळ , सांगली नोंदणी क्र.ई-९५४ , दि. १३.१०.१९९७ मूळ नाव युथ इंडिया, सांगली या संस्थेच्या बावधन येथील जमिन व त्यावरील मालमत्ता इत्यादी बदल संदर्भात बदल अर्ज क्र. ५१९ /२०१५ दाखल केलेला असून प्रकरण सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ , सांगली यांचेकडे न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

-----------------

**अहमदनगर - टेंभूर्णी (ता.करमाळा) चौपदरीकरणाचे**
**काम अपूर्ण अवस्थे-त असल्या बाबत**

**(१९) * ५२९५४ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर - टेंभूर्णी (ता.करमाळा) चौपदरीकरणाचे काम अपूर्णावस्थेनत असल्यामचे नुकतेच माहे फेब्रुवारी२०१६ मध्ये वा त्या दरम्यान आले आहे खरे आहे काय,
(२) असल्याचस उक्ती काम अपूर्णावस्थेमत असल्यामुळे याठिकाणी शेकडो अपघात होऊन मृत्यूअ होत आहेतहे ही खरे आहे काय,
(३) असल्या स सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय , त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार उक्त, कामास जबाबदार असणा-या व्य क्तींवर कोणती कारवाई करण्याळत आली आहे वा येत आहेनसल्यारस त्यायची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्ना उद्भ्‍ाकवत नाही.
(४) प्रश्ना उद्भ्‍ाकवत नाही.

-----------------

**बागलाण तालुक्यातील (जि.नाशिक) दहिंदुले व तताणी आश्रमशाळेचे काम अपूर्ण स्थितीत असल्याबाबत**

**(२०) * ५२८१६ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हालड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण तालुक्यातील (जि.नाशिक) दहिंदुले व तताणी आश्रमशाळेचे काम अपूर्ण स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहिंदुले व तताणी आश्रमशाळेच्या सुधारित अंदाजपत्रकाचे प्रस्ताव राज्य शासनाच्या आदिवासी विभागाकडे २ वर्षांपासून प्रलंबित आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे ५०० ते ६०० आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णुस सवरा** (१) अंशत : खरे आहे.

शासकिय माध्यमिक आश्रमशाळा तताणी येथील बांधकामास देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेनुसार शाळा इमारतीचा तळ मजला व पहिल्या मजल्याचे बांधकाम पुर्ण झाले आहे. दुस-या मजल्याचे बांधकाम विचाराधीन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय,

दि. ८/२/२०१६ च्या पत्रान्वये शासकिय माध्यमिक आश्रमशाळा , तताणी येथील शाळा इमारतीचे बांधकामास सुधारित प्रशासकिय मान्यता मिळण्याबाबतचे निवेदन प्राप्त आहे.

(४) व (५) शासकिय माध्यमिक आश्रमशाळा तताणी येथील शाळा इमारतीचे बांधकामाचे सुधारित प्रशासकिय मान्यतेचा आयुक्त , आदिवासी विकास यांच्याकडून प्राप्त प्रस्ताव सन २०१० -११ च्या जिल्हा दर सूचीवर आधारित

असल्याने सदर प्रस्ताव सन २०१६ -१७ च्या दरसूचीनुसार सुधारित करुन फेर सादर करण्याबाबत शासनपत्र दि. २९/२/२०१६ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास यांना कळविण्यात आलेले आहे.

-----------------

**माजलगांव (जि.बीड) तालुक्यारतील संजय गांधी निराधार व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांना थकीत वेतन देण्याबाबत**

**(२१) * ५२८१७ श्री.आर.टी.देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्यारय मंत्री**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) तालुक्या-तील संजय गांधी निराधार व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांचे वेतन गेली आठ महिन्यांपासून तहसीलदार, माजलगांव यांनी विविध कारणे दाखवून प्रलंबीत ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती लाभार्थ्यांचे वेतन अद्याप प्रलंबित ठेवण्यात आले आहे,

(३) असल्यास, अशा प्रकारे विविध कारणे दाखवून निराधारांना वेतनापासून वंचित ठेवून अन्याय करणाऱ्या तहसीलदार , माजलगांव यांच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंतचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

-----------------

**मुंबईतील नायगाव पोलीस हेडक्वाटर एल-१ अंतर्गत येणाऱ्या १ ते ९ इमारतींच्या मलनिस्सारण वाहिन्यांची झालेली दुरावस्था**

**(२२) * ४०७११ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) , श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायगाव पोलीस हेडक्वाटर एल-१ अंतर्गत येणाऱ्याव १ ते ९

इमारतींच्या मलनिस्सारण वाहिन्यांची मागील सुमारे २ वर्षांपासून दुरावस्था झाली असून दुषित पाणी जागोजागी तुंबल्याने डास , मच्छर आदींचा प्रा दुर्भाव तसेच सदरहू इमारतींतील शौचालयांची दुरावस्था झाल्याने येथे राहणाऱ्याच पोलीसांच्या तसेच त्यांच्या कुंटूंबियांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तातडीने दुरूस्तीची कामे हाती घेवून मलनिस्सारण वाहिन्या सुरळीत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही व्हावी म्हणून मागील २ वर्षांपासून सातत्याने व्यवस्थापक, उपअभियंता, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आदींकडे तेथील रहिवाशांनी तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुरूस्तीची कामे विनाविलंब हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) या वसाहतीतील रहिवाशी खरकटे अन्नपदार्थ तसेच प्लास्टिक पिशव्या, कागद व कपडयांचे गोळे , मोरी व प्रसाधनगृहामधून टाकत असल्याने मलनिस्सारण वाहिन्या व इन्स्पेक्शन चेंबर चोकओप होऊन मलनिस्सारण वाहिन्या खराब झाल्या आहेत , हे खरे आहे व ही वस्तुस्थिती पोलीस विभागाच्या मिळकत व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

या इमारतीच्या आवारातील मलनि:स्सारण वाहिन्या दुरुस्तीच्या कामावर मागील २ वर्षात सन २०१३ -१४ मध्ये रु.१९.७० लक्ष, सन २०१४-१५ मध्ये रुपये १७.०० लक्ष याप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत सन २०१५ -१६ मध्ये रुपये ६ .०० लक्ष रकमेची मलनिस्सारण वाहिन्यांच्या दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भ‍ा वत नाही.

-----------------

**गोंदी (ता.अंबड, जि.जालना) या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे व्यवस्थापक पिक कर्ज देण्यास दिरंगाई करीत असल्याबाबत**

**(२३) * ५२५६७ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामीण बँक पुरस्कृत बँक ऑफ महाराष्ट्र शाखा , गोंदी (ता.अंबड, जि.जालना) यांचेकडे पिक कर्जाची मागणी केली असता बँकेचे व्यवस्थापक पिक कर्ज देण्यास दिरंगाई करीत असल्या प्रकरणी दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी जालना यांचेकडे तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री. नामदेव लक्ष्मण जाधव , रा.जालना यांनी दि.२२ .१२.२०१५ व दि. ११ .०१.२०१६ रोजी महाराष्ट्र ग्रामिण बँक शाखा-गोंदी , ता.अंबड यांच्याकडे पीककर्ज मागणी संबंधात अर्ज दिला होता , तथापि सदर बँकेचे सन २०१५-१६ चे खरीप पीककर्ज वाटप पुर्ण झालेले होते व दि.०१ .०९.२०१५ पासून कर्ज वाटप बंद केलेले असल्याने अर्जदारास पुढील येणा-या खरीप हंगामात पीककर्ज वाटप करण्यात येईल असे बँकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवित नाही.

-----------------

**धुळे येथील आश्रमशाळा व वस्ती गृहांमधील मुलींच्यां सुरक्षिततेसाठी सल्लागार समिती स्थापन करण्याबाबत**

**(२४) * ४८५९१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील आश्रमशाळा व वसतीगृहांमधील मुलींच्याल सुरक्षिततेसाठी शासनाने सल्लागार समिती स्थापन करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले असून अद्याप समितीची स्थापना झाली नाही , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णुस सवरा** (१) हे खरे नाही.

याबाबत शासनाचे दि.९ /९/२००५ चे निर्देश असून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प , धुळे या कार्यालयातंर्गत असलेल्या आश्रमशाळा व वसतिगृहामधील मुलींच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी , धुळे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९/१/२०१६ रोजी जिल्हा सल्लागार समितीचे पु नर्गठन केलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भ्‌ाशवत नाही.

-----------------

## गोकुळ शिरगाव (जि.कोल्हापूर) येथे उभारण्यात आलेल्या कारखान्यांना इतर राज्याच्या तुलनेत वीजेचे दर जास्त असल्याबाबत

**(२५) * ५०७५१ श्री.हसन मुश्रीफ (कागल) , श्री.जितेंद्र आव्हा‌ाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुळ शिरगाव (जि.कोल्हापूर) येथे सन १९८५ -८६ मध्ये उभारण्यात आलेल्या कारखान्यांना इतर राज्याच्या तुलनेत वीजेचे दर जास्त असल्याने तसेच विमानसेवेची मागणी शासन मान्य करीत नसल्याने सुमारे ३०० ते ४०० कारखाने स्थलांतरीत होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त दनुसार सदर वसाहतीतील कारखाने स्थलांतरीत व कामगारांची उपासमार होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भ्‌ाशवत नाही.

(३) प्रश्न उद्भ्‌ाशवत नाही.

(४) प्रश्न उद्भ्‌ाशवत नाही.

----------------

**औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग - १ मधील अभियंत्यांनी केलेल्या गैरव्यवहाराचा अहवाल शासनास सादर केला नसल्याबाबत**

**(२६) * ४४२०९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) , श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग - १ मधील अभियंत्यांनी केलेल्या अपहाराची अधिक्षक अभियंता, औरंगाबाद यांनी चौकशी करुन, अद्याप अहवाल शासनास सादर केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , सदरहू अहवाल शासनास सादर करण्यास लागत असलेल्या विलंबाची व दुर्लक्षाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व किती निश्चित कालावधीपर्यंत अहवाल सादर होवून दोषींविरुध्द कारवाई करणे अपेक्षित आहे,

(३) शासनास चौकशी अहवाल सादर झाला असल्यास अहवालातील शिफारशींचे संक्षिप्त स्वरुप काय आहेत त्यानुसार दोषींविरुध्द अद्याप शासनाने कोणती कारवाई केली आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी दि.२२.०३.२०१६ रोजीच्या( पत्रान्वकये शासनास अहवाल सादर केला आहे.

(३) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांनी शासनास सादर केलेल्याी अहवालाची छानननी करण्यासत येत आहे.

-----------------

**लातूर जिल्हा- परिषद अध्याक्षांनी दलितवस्तीत विकास कामांना दिलेल्या स्थषगितीबाबत**

**(२७) * ५२५७७ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याऔय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य् शासनाने दलितवस्तीी विकास कामांसाठी ४९ कोटी २२ लाख रुपयांचा निधी लातूर जिल्हाा परिषदेला डिसेंबर२०१५ मध्यें वा त्या दरम्यान मंजूर करुन

निधी वितरणात पारदर्शकता यावी म्हेणून तो जिल्हा परिषदेच्यां सर्वसाधारण सभेत वितरीत करण्याचे अधिकार दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,त्याजनुसार लातूर जिल्हाय परिषदेच्याज सर्वसाधारण सभेच्या बैठकीत ४९ कोटी २२ लाख रुपयांच्याय निधीला मंजूरी देऊन या निधीतून लातूर जिल्ह्यातील ६५० गावांतील १ हजार ५२२ कामे करण्यातत येऊन सदर निधीतून दलित वस्तीतत पाणी पुरवठा मल:निस्सारण, वीज, गटारे, बांधकाम अंतर्गत रस्तेल अशी विविध कामे करण्यापचे प्रस्तानवित होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असतानाही अतिरिक्त मुख्यख कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्थातयी समितीच्या बैठकीमध्ये सदर कामांना अचानक स्थरगिती दिली, हे खरे आहे काय,
(४) असल्याकस, या प्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय ,चौकशीत काय आढळून आले
(५) असल्याकस, त्यानुसार ज्याच कामासाठी निधी मंजूर केला आहे त्या, कामासाठीच त्याकचा वापर व्हाचवा, दिलेली स्थयगिती उठविण्याचे दृष्टी ने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्याचत येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भचवत नाही.
(५) सदरची सर्व मंजूर कामे प्रगतीपथावर आहेत.
(६) प्रश्नस उद्भतवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने नियमबाहय पध्दतीने पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) येथील जमिन खरेदी प्रकरणात गैरप्रकार केल्याबाबत**

**(२८) * ५२८८४ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने नियमबाहय पध्दतीने चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा येथील जमिन खरेदी प्रकरणात गैरप्रकार केल्याचे शासनाच्या दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचा भूखंड क्र.१३७४ व १३७५ परावर्तीत प्लॉट नं. २ व ३ एकूण आराजी ५४६ चौ.मिटर ३३ ,१४,६२८ रुपयांची खरेदी केली आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याच दिवशी पोंभूर्णा येथील दोन खरेदी खताचा दर हा ८५० चौ.मी. शासन रेडीरेकनरप्रमाणे असून बँकेने खरेदी केलेला दर हा रुपये ६०७० .७५ पैसे दराने खरेदी केलेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, खरेदी खत दस्त क्र.३१२/२१५ प्रकरणी शेतकऱ्यांची बँकेने आर्थिक फसवणूक केलेली असल्यामुळे सदर बँकेच्या ५० शाखा तोट्यात चालत असल्याचे रिझर्व्ह बँकेला प्राप्त झालेल्या अहवालात निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर बँकेबाबत नोकरभरती , कर्जप्रकरणे, नियमबाह्य निकष डावलून केल्याच्या अनेक लेखी तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत , हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन बँकेचे विद्यमान अध्यक्ष तथा पदाधिकारी यांच्यावर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) त्याच दिवशी पोंभूर्णा येथील इतर खरेदीखताचा दर हा रु.८५०/चौ.मी. असल्याचे निष्पण्ण झालेले नाही. तथापि, बँकेने रु.६०७०.७५/चौ.मी. प्रमाणे खरेदी केलेली आहे.
(४) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सन २०१४ -१५ अखेरच्या वार्षिक तपासणी अहवालामध्ये मुख्यालयासह बँकेच्या एकूण ८२ शाखांपैकी ३२ नफ्यात व ५० शाखा तोटयात असल्याचे नमुद केले आहे. तथापि सदर खरेदी व्यवहारामुळे शेतक-यांचे कोणतेही नुकसान झालेले असणे यांचा कोणताही संबंध नाही.
(५) होय, हे खरे आहे.
(६) जिल्हा मध्यवर्ती सह. बँक मर्या. , चंद्रपुरच्या नोकरभरती प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपुर यांनी चौकशी करून दि. २२ .०५.२०१५ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला असून तक्रारकर्त्यांच्या तक्रारीमध्ये तथ्यांश आढळून येत नसल्याचे त्यांनी चौकशी अहवालात नमुद केलेले आहे.

तसेच नियमबाहय , निकष डावलून केलेल्या कर्जप्रकरणांच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपुर यांनी चौकशी करून दि. २२.०५.२०१५ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला असून त्याप्रमाणे या कार्यालयाने कायदा कलम ८३ अन्वये दि.०३.०८.२०१५ रोजी आदेश निर्गमीत करून उक्त कर्जप्रकरणांची चौकशी करण्याकरीता श्री.पी.बी.पाटील , सहाय्यक निबंधक (प्रशासन) अंतर्गत जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था , चंद्रपुर यांची नेमणूक केलेली आहे. सदर आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालय , खंडपीठ नागपुर येथे रिट पिटीशन क्र.६९३२/२०१५ दाखल करण्यात आलेली असून मा.उच्च न्यायालय , खंडपीठ नागपुर यांनी सदर आदेशास स्थगिती दिलेली आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(७) प्रश्न उद्भ्‍ा वत नाही.

-----------------

**नांदेड शहरालगत असलेला सांगवी येथील आसना नदीवरील पुल जिर्ण झाल्याबाबत**

**(२९) * ५२७७५ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरालगत असलेल्या आसना नदीवरील जूना पूल हा एकमार्गी वाहतूकीसाठी वापरण्यात येत असून या पुलाची अवस्था अतिशय खराब झाली असून वरील रस्त्याची दुरावस्था झाली असल्याने अपघातांची संख्या वाढत असल्याची बाब माहे जानेवारी , २०१६ च्या चौथ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्या‍ात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

अकोला-हिंगोली-नांदेड राष्ट्रीकय महामार्ग क्र. १६१ वरी साखळी क्रमांक २०४/००० मध्येल १४६.० मीटर लांबीचा आसना पूल असून पुलावर पडलेले खड्डे हे दोषदायित्व० अंतर्गत संबंधित कंत्राटदाराकडून माहे डिसेंबर , २०१५ पुर्वीच

भरण्यादत आले होते. सदर पुलाच्यार शेजारी नवीन पुल बांधण्यानत आला असून प्रश्नांकित जुन्यार पुलावरुन एकेरी वाहतुक सुरु आहे.

पुलाचे पाईपरेलींग जुनी झाल्यामुळे त्यारठिकाणी नवीन कठडे व इतर दुरुस्ती करण्याचे काम २०१६-१७ च्या वार्षिक आराखड्यात प्रस्तावित करण्यात आले आहे.

सदर पुलावर मागील ३ वर्षामध्येम ५ अपघात घडले असून त्यातमध्येर ४ व्य क्तींलचा मृत्यू झाला आहे. तथापि सदरील अपघात हे चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्कातळजीपणे चालविल्याने झाल्यातचे अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कळविले आहे.

(३) प्रश्नळ उद्भ्वत नाही.

-----------------

**कासोदा (ता. पारोळा, जि.जळगांव) येथील प्रशासकीय इमारतीचे हस्तांतरण करण्यात आले नसल्याबाबत**

**(३०) * ५२९२२ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासोद येथील (ता.परोळा, जि.जळगांव) रस्त्याला लागून असलेल्या गट नंबर २४५११ मध्ये तब्बल ३ .५ कोटी रुपये खर्चाच्या प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण होऊन सहा वर्षे उलटली तरी या इमारतीचे हस्तांतरण करण्यात आले नाही , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची इमारत अदयापर्यंत हस्तांतरण न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची इमारत वापराविना पडून असल्याने तिची दुरावस्था होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भ वत नाही.

-----------------

**उल्हा-सनगर कँम्पं क्र. ५ येथील महिला निरीक्षणगृहातील कर्मचारी निवासस्थानाच्या नुतनीकरण कामात झालेला गैरव्यवहार**

**(३१) * ५०३३८ श्री.रुपेश म्हाषत्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हाजसनगर कँम्पव क्र. ५ येथील महिला निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यां्च्या निवासस्थानाच्या नुतनीकरणाचे काम गेल्याम ५ वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व संबंधित ठेकेदारांच्या दिरंगाईमुळे अपूर्ण झाल्याचे व त्यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याने याबाबतची सीआयडी चौकशी करण्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी , नागरिकांनी मा.महिला व बालकल्याण मंत्री यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , सदर ब्रिटीशकालीन बॅरेक्सची उंची वाढविणे व डागडुजी करण्याच्या कामात श्री.चंदर अजवानी या ठेकेदारांच्या साई साधना कंपनीने अत्यंत निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण काम करुन खर्च ६१ लाख रुपयांचा दाखविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर निरीक्षणगृहाच्या कामास विलंब लावणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांविरुध्द व निकृष्ट , अपूर्ण काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्ना उद्भ्ा वत नाही.

-----------------

## अंकलेश्वर-ब-हाणपूर या महामार्गावरील यावल ते फैजपूर या टप्प्यातील निकृष्ट व बोगस प्रतीच्या कामाबाबत

**(३२) * ५२७३५ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंकलेश्वर-ब-हाणपूर या महामार्गावरील यावल ते फैजपूर (जि.जळगाव) या टप्प्यात अतिशय निकृष्ट व बोगस प्रतीचे काम केल्याचे दिसून आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास , या रस्त्याशी संबंधित असलेल्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांजवळ वारंवार तक्रार करूनही कामाचा दर्जा सुधारलेला नाही व या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिका-यांवर व ठेकेदारांवर शासन कारवाई करणार आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

अंकलेश्वचर-ब-हाणपूर रस्ता? रामा-४ किमी. ३१५ /५०० ते ३३५ /०० या लांबीतील रस्त्ा सुधारणेची कामे तांत्रिक मान्यातेप्रमाणे व कामांच्याक बाबींच्या मानकाप्रमाणे करण्याृत आलेली आहेत.

(२) व (३) विषयाधीन रस्यान्वरील कामे आजही सुस्थितीत आहेत. सदर कामांची दक्षता व गुणनियंत्रण मंडळ , नाशिक, येथील अधिका-यांनी दि.२६ .२.२०१६ रोजी पाहणी केली असून कामाच्याळ गुणवत्तीबाबत कोणतेही प्रतिकूल शेरे नाहीत.

-----------------

## ठाणे-पालघर जिल्हयातील आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगिण विकास आराखड्यास मंजुरी दिलेली असल्याबाबत

**(३३) * ४१९१८ श्री.जितेंद्र आव्हारड (मुंब्रा कळवा) , श्री.सुरेश लाड (कर्जत) , श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) , श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-पालघर जिल्हयातील आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी ५६५ कोटी २० लाख रुपये खर्चाच्या विकास आराखडयात आदिवासी उपयोजने अंतर्गत

जिल्हास्तरीय योजनांच्या प्रारुप विकास आराखडयास नाशिक येथे
दिनांक २२ जोनवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत अंतिम मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१ ) मधील प्रकरणी मंजुरी दिलेल्या प्रारुप विकास आराखडयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानूसार परिसरातील आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन आदिवासी भागातील लोकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास , विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णुह सवरा :**(१) होय, हे खरे आहे.

शासन परिपत्रक दि.१८ .९.२०१५ मधील मार्गदर्शक तत्वाेनुसार ठाणे व पालघर जिल्हयासचा सन २०१६-१७ चा आराखडा तयार करण्याशत आलेला आहे.

(२) ठाणे-पालघर जिल्हयापतील आदिवासींच्याा सर्वांगीण विकासासाठी कृषीइंदिरा आवास योजना, पाटबंधारे, विद्युत विकास, रस्तेर विकास पाणीपुरवठा, शासकीय आश्रमशाळा व वसतीगृह , भारतसरकार शिष्य्वृती , ठक्करबाप्पाी आदिवासी वस्तीशसुधारणा योजना, अंगणवाडीतील मुलांना पौष्टी्क आहार , डॉ.ए.पी.जे.अब्दुदल कलाम अमृत आहार योजना इत्यािदी योजनाकरीता भरघोस तरतूद प्रस्तांवित करण्यामत आलेली आहे.

(३) प्रश्नआ उद्भ्ाकवत नाही.

-----------------

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यासतील शासकीय आश्रमशाळेत**
**अनेक सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३४) * ५१९७७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्या तील पश्चिम आदिवासी भागातील आहुपे येथे असलेल्या) शासकीय आश्रमशाळेत अनेक सुविधांचा अभाव असून तेथे स्त्री

अधिक्षिका नसणे , वॉचमन नसणे , आश्रमशाळेला संरक्षक भिंत नसणे तसेच नवीन वसतिगृह बांधून तयार असूनही त्याणठिकाणी वसतिगृहाचे स्थकलांतर अद्याप केले नसल्याहने या आश्रमशाळेतील मुला-मुलींना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्या स याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , असल्या स त्यावत काय आढळून आले आहे,

(३) नसल्या स विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

आहुपे येथील शासकीय आश्रमशाळेकरिता स्त्री अधिक्षिका नेमण्याबाबतची कार्यवाही सुरू असून सद्यस्थितीत जुलै , २०१५ पासून तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर स्त्री अधिक्षिका नियुक्ती केली आहे. तसेच येथे नियमित सुरक्षा रक्षक कार्यरत आहे.

आहुपे येथे नवीन टाईप प्लॅन प्रमाणे बांधकाम करण्यात येत आहे , यामध्ये शालेय इमारतीचे काम पुर्ण असून शालेय इमारत ताब्यात घेतली आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी केली असता वसतीगृह इमारत बांधकाम अपूर्ण आहे , सदर वसतीगृह बांधकामातील त्रुटी पूर्ततेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

-----------------

**राज्यात कोणत्याही टोलनाक्यावर नागरिकांना ३ मिनिटापेक्षा जास्त काळ थांबावे लागल्यास टोल न घेताच सोडण्याचे धोरण लागू करण्याबाबत**

**(३५) * ५३१८१ श्री.राहूल कुल (दौंड)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोणत्याही टोलनाक्यावर नागरिकांना ३ मिनिटापेक्षा जास्त काळ थांबावे लागल्यास टोल न घेताच सोडण्याचे धोरण लागू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणानुसार जिल्हाधिकारी पुणे यांनी पुणे जिल्ह्यातील टोलनाक्यांवर नियमाची अंमलबजावणी करण्याचे आदेश देऊनही टोल वसूल करणाऱ्या कंपन्या आदेशाचे पालन करत नसल्याची बाब माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टोलनाक्यावर ३ मिनिटांपेक्षा जास्त काळ थांबावे लागल्यास टोल न घेताच सोडण्याच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्ना उद्भ्ाकवत नाही.

-----------------

**मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याकरिता निधी उपलब्ध नसल्याबाबत**

**(३६) * ४०३९८ श्री.राधाकृष्णव विखे-पाटील (शिर्डी):** सन्माननीय **सामाजिक न्याउय मंत्री**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागासवर्गीय प्रवर्गातील अनुसूचित जाती/जमाती , विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी योजना राबविण्याकरिता त्यांना कर्ज उपलब्ध करुन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सामाजिक न्याय विभागातंर्गत मागास प्रवर्गासाठी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ , साहित्य रत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ , वसंतराव नाईक विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ , अपंगासाठी अपंग विकास महामंडळ तर ओबीसीकरिता ओबीसी विकास महामंडळाची निर्मिती करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त महामंडळाकडे कल्याणकारी योजना राबविण्याकरिता आर्थिक निधी उपलब्ध नसल्याने मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असून काही महामंडळाकडे कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याकरिता निधी उपलब्ध नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत , त्यानुसार वरील महामंडळांना त्यांच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) अंशत: होय,

(३) व (४) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ वगळता उर्वरित पाच महामंडळांना भागभांडवलापोटी सन २०१५ -१६ मध्ये मंजूर करण्यात आलेली तरतूद वितरीत करण्यात वित्त विभागाने अद्याप मान्यता दिलेली नाही. सदर मान्यता प्राप्त होताच महामंडळांना मंजूर निधी वितरीत करण्यात येईल.

-----------------

**बोरगांव मठ (ता. जाफराबाद, जि.जालना) येथील पूलाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(३७) * ५२६९३ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफराबाद तालुक्यावतील (जि.जालना) बोरगांव मठ येथील पूलाचे काम गेल्या अनेक वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असून सदर पूलाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी संबंधित अधिका-यांकडे वारंवार तेथील नागरिक करीत आहेत , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे काम अपूर्ण अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या पूलाचे काम तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) निधीच्या अपुऱ्या तरतूदीमुळे काम विहीत मुदतीत पूर्ण झाले नाही.

(३) प्रश्नाधीन पुलाचे बांधकाम निधीच्या उपलब्धतेनुसार डिसेंबर २०१५ अखेर पूर्ण झालेले आहे. पुलाच्या पोचमार्गाचे कामासाठी मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पात रु.४०.०० लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली असून पोचमार्गाचे काम प्रगतीत आहे. सदर काम मे २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळास कर्जवाटपासाठी निधी मिळाला नसल्यावबाबत**

**(३८) * ५३०८४ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सामाजिक न्याउय मंत्री**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाला सन २०१४ ते २०१५ व सन २०१५ ते २०१६ या दोन वर्षाच्या काळात शासनाकडून कर्जवाटपासाठी निधी मिळाला नसल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यान दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्या स यामुळे जालना जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून गरजू अपंगांना स्वीयंरोजगार किंवा व्यहवसायासाठी कर्ज वाटप करण्याकत आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्याकस शासनाने कर्जवाटपाकरीता गेल्या दोन वर्षात निधी न देण्याहची कारणे काय आहेत,

(४) असल्याकसया महामंडळाला तातडीने कर्ज वाटपाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याकसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्याडत येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे अंशत: खरे आहे , महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळास राष्ट्रीय अपंग वित्त एवम् विकास निमग , नवी दिल्ली यांचेकडून सन २०१४-१५ मध्ये रु. २२२५.९३ लाख व सन २०१५-१६ मध्ये रु. ८८३.८२ लाख इतका निधी निधी प्राप्त झाला आहे. तसेच, राज्य शासनाकडून भागभांडवल स्वरुपात सन २०१४-१५ मध्ये रु. २०८.३३ लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे.

सन २०१५-१६ मध्ये रु. १००० लाख एवढी तरतूद मंजूर केलेली असून सदर तरतुद वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) व (४) सन २०१५-१६ मधील मंजूर तरतुद वितरीत करण्याकरीता वित्त विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.